# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.12.2024** **वार:बुधवार**

1. राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय दिव्यांगजन सक्षमीकरण पुरस्कारांचं वितरण; राज्यातल्या तीन व्यक्ती आणि एका संस्थेचा सन्मान
2. मुंबईत केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शताब्दी स्तंभाचं उपराष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन
3. बँकिंग कायदा सुधारणा विधेयकाला लोकसभेची मंजुरी आणि
4. राज्याच्या विविध भागात पावसाची हजेरी; आजही तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज

**राष्ट्रपती पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय दिव्यांगजन सक्षमीकरण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त, या समारंभात, दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या 22 व्यक्ती आणि 11 संस्थांना सन्मानित करण्यात आलं. या सन्मान सोहोळ्यातून आणखी काही व्यक्ती आणि संस्थांना दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी काम करण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी प्रोत्साहन देणं, कौशल्यविकासासाठी संधी देणं, त्यांना रोजगार पुरवणं, दिव्यांगांनी तयार केलेल्या वस्तू खरेदी करण्याला प्राधान्य देणं आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणं यामुळे त्यांच्यातील क्षमतांना बळ मिळेल असं राष्ट्रपती म्हणाल्या.

सुगम्य भारत अभियानामुळे दिव्यांग व्यक्तींना कुठेही जाणं सुलभ झालं आहे. दिव्यांगांना दयेची नाही तर सहानुभूतीची गरज आहे, कोणावर अवलंबून न राहता आपणही स्वतंत्ररित्या वावरू शकतो याची जाणीव त्यांना करुन देण्यासाठी सर्व समाजानं प्रयत्न करणं गरजेचं आहे असं राष्ट्रपती म्हणाल्या. या कार्यक्रमात श्रवणदोष असलेल्या मुलांच्या शिक्षिका प्रियंका दीपक दबडे आणि प्रथमेश सिन्हा हा विद्यार्थी या पुण्यातल्या दोघांचा तसंच कनिका अग्रवाल यांचा सन्मान करण्यात आला. दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी काम करणारी सर्वोत्कृष्ट संस्था या श्रेणीत मुंबईतल्या सेंट झेवियर्स कॉलेजच्या झेवियर्स रिसोर्स सेंटर फॉर द व्हिज्युअली चॅलेंज्ड या संस्थेचा सन्मान करण्यात आला.

भारताला खऱ्या अर्थानं सर्वसमावेशक बनवण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं 9 वर्षांपूर्वी सुगम्य भारत अभियान सुरू केलं. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या दृष्टीकोनानुसार दिव्यांग व्यक्तींनाही सर्व सुविधांचा लाभ घेता यावा यासाठी हे अभियान सुरू करण्यात आलं. ऐकूया या अभियानाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**दिव्यांग व्यक्तींचे हक्क आणि त्यांना प्रत्यक्षात मिळत असलेल्या सुविधा यातील दरी भरुन काढण्यासाठी 2015 मध्ये सुगम्य भारत अभियान सुरू करण्यात आलं. गेल्या 9 वर्षांत या अभियानाद्वारे बऱ्याच गोष्टी साध्य करण्यात यश आलं आहे. बहुतांश सरकारी इमारतींमध्ये, तसंच विमानतळ, रेल्वे, बसमध्येही दिव्यांगांना सहजा वापरता येतील असे बदल करण्यात आले. केंद्र आणि राज्य सरकारांच्या विविध संकेतस्थळांची रचनादेखील दिव्यांग अनुकूल करण्यात आली आहे. शिक्षणासह माहिती आणि मनोरंजनाच्या**

**क्षेत्रातही दिव्यांगांसाठी अनुकूल बदल घडवण्यात आले. 2015 मध्येच दिव्यांगांसाठीच्या सांकेतिक भाषा संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. तसंच सुगम्य भारत ऍपही तयार करण्यात आलं असून त्यावर दिव्यांग व्यक्तींना पायाभूत सुविधांबाबतची तक्रार नोंदवता येते. या अभियानामुळे गेल्या 9 वर्षांत दिव्यांगांच्या आयुष्यात अनेक सकारात्मक बदल घडून आले आहेत. देश शाश्वत विकासाच्या वाटेवर असताना या विकासापासून कोणीही वंचित राहणार नाही याची हमी देणारं हे अभियान आहे असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आकाशवाणी बातम्यांसाठी सुरेखा जोशी, पुणे.**

राज्यातही ठिकठिकाणी दिव्यांग दिनानिमित्त विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. सांगलीत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये अस्थिव्यंग, मूकबधिर, मतिमंद, अंध विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केला. दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक वस्तूंचं प्रदर्शनही मांडण्यात आलं होतं. लातूरमध्येही जिल्ह्यातल्या विशेष शाळा, कार्यशाळा आणि मतिमंद बालगृहांनी मिळून सांस्कृतिक स्पर्धा आयोजित केली होती. गडचिरोली इथं दिव्यांग व्यक्तींना ओळखपत्र, आणि आवश्यक उपकरणांचं वाटप करण्यात आलं. नांदेडमध्ये दिव्यांग कल्याण कृती संघर्ष समितीनं प्रलंबित प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते काल मुंबईत केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन करण्यात आलं. तसंच संस्थेनं विकसित केलेली दोन नवी तंत्रज्ञानं आणि संस्थेच्या कामाशी संबंधित तीन पुस्तकांचं प्रकाशनही या कार्यक्रमात झालं. भारताला जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवण्यात शेतकऱ्यांचा मोलाचा वाटा असेल असं सांगून देशाच्या अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी कृषी क्षेत्र आहे असं उपराष्ट्रपती यावेळी म्हणाले. शेती आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी कृषी मंत्रालय आणि कृषी संशोधन विभागानं प्रयत्न करावेत असं त्यांनी सांगितलं. केंद्रिय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान, राज्यमंत्री रामनाथ ठाकूर, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासह अन्य मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>संसद</u>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनातले पहिले पाच दिवस विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज झालं नव्हतं, पण काल सहाव्या दिवशी प्रश्नोत्तरांचा तास आणि शून्य प्रहरात सार्वजनिक हिताच्या अनेक मुद्यांवर चर्चा झाली. विरोधकांनी विविध मुद्यांवरून निदर्शनं करत सभात्याग केला; मात्र तरीही कामकाज सुरू राहिलं. लोकसभेत बँकिंग कायदे सुधारणा विधेयक 2024 मंजूर करण्यात आलं. या विधेयकानुसार वारसदारांची अर्थात नॉमिनीजची संख्या चारपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे बँक प्रशासनात अधिक बळकटी येणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. राज्यसभेत तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक 2024 ला काल मंजुरी देण्यात आली. या विधेयकामुळे तेल आणि वायू क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ होईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं. शेतमालाच्या हमीभावात तिप्पट वाढ करण्यात आल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

**<u>शपथविधी</u>**

राज्यात नवनिर्वाचित महायुती सरकारचा शपथविधी सोहळा उद्या होणार आहे. मुंबईत आझाद मैदानावर होणाऱ्या शपथविधी सोहळ्याच्या तयारीची पाहणी काल महायुतीतल्या नेत्यांनी केली. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री, रालोआ शासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत.

**महापरिनिर्वाण**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर इथं चैत्यभूमीवर होणाऱ्या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून झालेल्या बैठकीत घेतला. महापरिनिर्वाणदिनाच्या तयारीमध्ये कोणतीही कमतरता राहू नये असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**गेटवे ऑफ इंडिया**

मुंबईची ओळख असलेल्या गेट वे ऑफ इंडियाला आज शंभर वर्षं पूर्ण होत आहेत. ब्रिटिश सम्राटांच्या भारतभेटीच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या गेट वे ऑफ इंडियानं गेल्या 100 वर्षांमध्ये अनेक स्थित्यंतरं पाहिली, अनेक ऐतिहासिक घटनांचा तो साक्षीदार झाला. या वास्तूबद्दल आपल्याला सांगत आहेत मुंबईच्या इतिहासाचे अभ्यासक भरत गोठोस्कर....

**फिशिंग स्पर्धा-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्गच्या भोगवे तसंच निवतीच्या समुद्रात पहिल्यांदाच खोल समुद्रातली, बोटीच्या माध्यमातून करण्यात येणारी रॉड फिशिंग स्पर्धा नुकतीच झाली. 'कोकण एक्स्ट्रीम अँगलर्स' यांच्या वतीनं भरवण्यात आलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रसह कर्नाटक, गोवा आणि केरळमधून 59 स्पर्धक सहभागी झाले होते. ऐकुया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**रॉड फिशिंग स्पर्धेचं यंदाचं हे सहावं वर्ष असलं तरी गेली पाच वर्ष ही स्पर्धा किनाऱ्यालगत होत होती. यंदा पहिल्यांदाच खोल समुद्रात ही स्पर्धा घेण्यात आली. जिगिंग, पॉपिंग, स्पिनिंग, ट्रॉलिंग या रॉड फिशिंग मधील क्रीडा प्रकारानं मासे पकडण हा या स्पर्धेचा मुख्य नियम होता; तसच माशांच्या दुर्मिळ आणि संरक्षित प्रजाती जर चुकून गळाला लागल्या तर त्या पुन्हा समुद्रात सोडून द्याव्यात हा देखील नियम बंधनकारक होता. जास्तीत जास्त 30 किलो वजनाचे छोटा गोबरा सुरमई यासारखे मासे पकडण्यास परवानगी देण्यात आली होती. गोबरा, कोकेरी, बोडावा, डागोळ, सुरमई अश्या प्रजातींचे मासे निवती लाइट हाऊस परिसरात असल्यान ही स्पर्धा त्या परिसरातल्या खोल समुद्रात खेळवली गेली. या स्पर्धेत कर्नाटकमधल्या टीम मलबारीझ संघान साडेबारा किलोचा गोबरा प्रजातीचा मासा पकडून पहिला तर रत्नागिरीच्या रेड मरीन संघान दुसरा आणि गोव्याच्या लुअर लीजंट या संघान तिसरा क्रमांक पटकावला. आकाशवाणी बातम्यांसाठी निलेश जोशी, सिंधुदुर्ग.**

**हवामान**

राज्यात काल सर्वत्र अंशतः ढगाळ हवामान होतं. सोलापूरसह कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडल्याची नोंद आहे. आज कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर विदर्भात हवामान कोरडं राहील असं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.